**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.org

**: संपादिका :**

**सुहासिनी कीर्तिकर**

**: कार्यकारी संपादकमंडळ :**

**मिनाक्षी जयकर**
**मयुरा नायक**
**संजना कोठारे**
**वैजयंती कीर्तिकर**

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

**वर्ष ८८ वे) प्रभुतरुण मुंबई, सोमवार, ता. १६ माहे एप्रिल, सन २०१२ (अंक ९९१**


*संपादकीय*

## सर्वम् शुभेच्छा

**—सुहासिनी कीर्तिकर**

मित्रहो, जानेवारी महिन्यात नववर्षाच्या शुभेच्छा साऱ्या 'प्रभुतरुण' परिवाराला मी दिल्या होत्या. पण ते होते जागतिक पातळीवरील नवीन वर्ष. या महिन्यापासून आपले हिंदूंचे नवीन वर्ष सुरू होतेय्. चैत्र प्रतिपदेपासून. शुभेच्छा काय; पुन्हा पुन्हा दिल्या तरी त्यांचा आतून अखंड झरा चालूच असतो. या वाहत्या चैतन्यमयी झऱ्यात मनाने पुन्हा एकदा आनंदाने बुचकळून मित्रांनो, तुम्हाला पुन्हा एकदा नववर्षाच्या शुभेच्छा. नाहीतरी आपले केवळ 'स्वागतम्' म्हणून समाधान होत नाहीच. स्वागत म्हणजे सु आगत. पण आपण भरभरून सुस्वागत म्हणतोच ना?सु सु आगत! त्याच धर्तीवर जानेवारीत एकदा नववर्षाच्या शुभेच्छा. आता पुन्हा भरभरून चैत्रात नववर्षाच्या शुभेच्छा.

चैत्रात नवी पालवी फुटते, तशी प्रभुमनाला सर्जकतेची नवी पालवी फुटू दे. झाड चैतन्याने सळसळून जाऊ दे. 'टाया वाजविती पानं' असं बहिणाबाई कल्पना करत म्हणतात. तसं प्रभुसमाजातील वेगवेगळ्या संस्थांच्या सेवाभावी कार्याची एकच आनंददायी टाळी वाजू दे. मगच खऱ्या अर्थाने 'ब्रह्मानंदी टाळी' लागेल. खरं की नाही? द्या टाळी!

गंमत जाऊ द्या यामागची. पण खरंच चैत्र म्हणजे नवीन शुभारंभ. 'प्रतिपदा' म्हणजेच पहिला दिवस. त्याचं महाराष्ट्रीत झालं पत्तिपद्द. मग मराठीत येताना 'त्ति' मधील डबल 'त'उच्चारसौकर्यासाठी बाद झाला अन् 'प'चा 'पा' झाला. 'पा' झाल्यावर मग 'त' तरी कशाला उगाच जीभेला व्यायाम द्यायला? मग आपलं 'पापदा' असं बोबडं रूप! पुढे तेही गेलं अन् 'पादपा' झालं. याला ध्वनिशास्त्रात वर्णव्यत्यास म्हणतात बरं का! भरताच्या ध्वनिशास्त्रात असे अनेक नियम आहेत की ज्यामुळे आपली भाषा नवी वळणं घेत जीवंत रहाते.त्यातलाच एक नियम म्हणजे 'पोवः।' म्हणजेच 'प'चा 'व' होतो. जसं की पाहा; मंडप शब्दातील 'प'चा 'व' होऊन मांडव शब्द झाला. अगदी त्याच थाटात 'पादवा' झाला आधी; अन् मग 'पाडवा'! त्यात 'ड'कार आल्याने आता 'पाडवा' शब्द कसा फेटा बांधलेला मराठी माणूस वाटतो ना? हकार, डकार, ळकार ही तर आपली खासियत. 'पाडवा' या शब्दानेच तो केवळ मऱ्हाटी नाही. संस्कृतीनेही मराठीच आहे. (परवाच्या समारंभात श्री. माधव जयकरांची 'पाडवा' शब्दाबद्दलची शंका श्री. मधुकर तळपदे यांनी विचारली म्हणून 'पाडवा' या शब्दाची व्युत्पत्ती इथं लेखाचा अंश ठरली. या दोघांनाही धन्यवाद!)

हल्ली संस्कृतीबद्दल चांगल्या अर्थाने जाग येऊ लागली आहे. मग पाडव्याला हिंदू, मराठी संस्कृतीदर्शन घडविणाऱ्या शोभायात्रा ठिकठिकाणी निघू लागल्यात. डोंबिवलीकरांनी सुरुवात केली. म्हणजेच चांगल्या गोष्टीचा शुभारंभ केला. मग हे लोण गिरगाव, दादर, पार्ले, कल्याण असे पसरत गेले. घरापुढच्या सुबक रांगोळ्या रस्तोरस्ती अगदी शंभर फुटी आकारात डोळ्यांना सुखवू लागल्या. पारंपारिक पोशाख- अगदी पगडी, फेट्यासकट आणि नऊवारी लुगड्यासकट प्रतिष्ठित झाले.

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## या चिमण्यांनो परत फिरा...

**—मिनाक्षी जयकर**

'एक होता काऊ आणि एक होती चिऊ. काऊचं घर होतं शेणाचं आणि चिऊचं घर होतं मेणाचं.एकदा काय झालं.....' बालपणी रोज झोपतांना ऐकायच्या ठराविक गोष्टीतली ही एक गोष्ट. ऐकून ऐकून तोंडपाठ झालेली. पण तरीही त्यातील नाविन्य न ओसरलेली. काऊ-चिऊ आपले बालमित्र-मैत्रीणच जणू झालेले. या गोष्टीतल्या कावळेदादा आणि चिऊताईला भेटल्याशिवाय झोपणं त्यावेळी आमच्या बालमनाला पटत नसे.

कधीकधी आमच्या आजीला गोष्ट सांगायच्यावेळी आमची गंमत करायची लहर यायची. मग ती आम्हाला कापूसकोंड्याची गोष्ट सांगायला सुरुवात करायची. त्यातली 'एक चिमणी आली, एक दाणा घेऊन गेली. एक चिमणी आली, एक दाणा घेऊन गेली' हे ऐकता ऐकता कधी डोळा लागायचा कळायचं देखील नाही.

दाण्यावरून आठवलं. आमच्या लहानपणी आई-आजी तांदूळ निवडायच्या. तेव्हा आजच्यासारखी सुपर-मार्केट संस्कृती नव्हती- स्वच्छ तांदळाची पॅकेटस् आणा, उघडा आणि वापरा. तांदूळ वापरायला सुरुवात करण्याआधी ते निवडावे लागत. मग हे भातकण फेकून न देता खास चिमण्यांना खाण्याकरता आई खिडकीवर टाकायची. चिमण्यांना खायला सोयीचं जावं म्हणून मुद्दाम पसरून ठेवायची. टिप टिप दाणे टिपणाऱ्या चिमण्या बघताना आम्हा मुलांना खूप मजा यायची. पण त्यांना लांबूनच बघायचं बरं का! जरा जवळ येतोय असं वाटलं की त्या भुर्रकन उडून जायच्या.

अशा या चिमणीची दोस्ती इथपर्यंतच मर्यादित नव्हती. अगदी बालपणी आम्हाला घास भरवताना आई म्हणायची, 'एक घास चिऊताईचा, एक घास कावळेदादाचा.'असं करत ते जेवण चाले. थोडं मोठं झाल्यावर म्हणजे शाळेत जाऊ लागल्यावर सुरुवातीची मुळाक्षरं आम्ही पाटीवर गिरवली . ती पाटी ओल्या फडक्याने पुसून स्वच्छ करावी लागे. मग ती सुकेपर्यंत आमचं पालुपद सुरू होई, 'चिमणी चिमणी वारा घाल....'

पुढे आणखी मोठे झाल्यावर ना. वा. टिळकांची 'केवढे हे क्रौर्य' ही कविता वाचनात आली. एक चिमणी आपल्या पिल्लासाठी चारा आणायला जाते आणि एका बाणाचे लक्ष्य होते. पण त्याही अवस्थेत ती आपल्या पिल्लाला चारा पोचवते आणि मगच आपले प्राण सोडते. माणसाने केवळ शिकारीच्या हौसेपोटी एका निष्पाप जीवाचा घेतलेला बळी मनात ठसठसतो. लहानपणापासून भेटत असलेली चिऊताई मोठेपणी याही रुपात मनात घर करून गेली.

जरा खिडकी उघडी दिसली की चिमण्या घरात शिरत. ती घरात उडताना आरशासमोर आली की आरशावर म्हणजे स्वतःच्याच छबीवर टप-टप ठोके मारू लागे. शेवटी चिऊ 'ताई'च ना ती? कुठेही आरसा दिसला की त्यात स्वतःची छबी न्याहाळण्याच्या बायकांच्या (?) सवयीला ती तरी कशी अपवाद असणार?

'चिव चिव चिमणी छतात,
टिपे ठोके आरशात'

(पान २ कॉलम ३ वर)

(पान१ कॉलम २ वरून)

संस्कृतीचं मूळ जोपासणं महत्त्वाचंच असतं की! 'हिपस्टर्स' एरवी ठीक. पण 'सुंदरा मनामधी भरली' अशी थाटाची वसने संस्कृतीसंपन्न असतात. त्यांचे या शोभायात्रेतून दर्शन झाले की डोळे निवतात. मन भरते. तृप्त होते आणि खऱ्या अर्थाने पाडवा साजरा होतो.

चैत्रात सगळेच 'बसंती'! निसर्ग कात टाकून बहरास येणारा. पळस, गुलमोहोर, जॅकरांडा, लॅबरनम आपली संपत्ती उधळून टाकणारे. देवळे दीपमाळांनी सुशोभित झगमगणारी. पाडवा म्हणजे रामाच्या नवरात्राची सुरुवात. कर्तृत्वाची, विजयाची चाहूल. रामनवमी म्हणजे येणाऱ्या अरिष्टांना प्रत्यंचेने नष्ट करणाऱ्या, पापाचे क्षालन करणाऱ्या रामजन्माचा सोहळा. अयोध्या काय फक्त उत्तरेतच आहे का? ती सर्वांच्या मनात आहे. तेथे घडणाऱ्या सर्व पातकांचे शमन करणाऱ्या विवेकी रामाचा जन्म म्हणजे आपल्या मनातील विवेकाचाच पुन्हा साक्षात्कार. या विवेकाला, पराक्रमाला, सत्कार्याला, समतोल बुद्धीला साथ देणारे बळ म्हणजे मारुती. 'मनोजवं मारुत तुल्यवेगं' असणाऱ्या हनुमानाचा जन्मही या चैत्रातच रामजन्माची पाठराखण करीत येतो.महाकाय, महाशक्तीचे रूप असणारा हनुमान 'नेटका सडपातळू' आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. राजकारणी माणसे विजयी झाली की त्यांचे 'उदरभरण' इतके होते की त्यांचे शरीरच काय; अंगावरचे दागिनेही 'सडपातळू' रहात नाहीत! विवेकाला सोबत करणाऱ्या शरीरबळाची जोपासना शिकवणाऱ्या महाबलीचा जन्म म्हणून चैत्रातच. वर्षाच्या शुभारंभालाच त्याची जाण मनामनांत यावी म्हणून!

ही जाण आली तरच नववर्ष भरभराटीचे, मानसिक सुबत्तेचे जाईल! यासाठी मित्रहो, पुन्हा एकदा नववर्षाच्या मनापासून शुभेच्छा!

हिंदू नववर्ष केवळ सणांनी गजबजलेले नसते. पालवलेल्या वसंतातही कडकडीत ऊन असतेच ना? तसे सणांबरोबर कडकडीत वैराग्याचा मनस्पर्श करणारे उपासतापासही असतातच. मानसिक शुचितेसाठी, शारीरिक निरोगी अभिसरणासाठी, बुद्धीचापल्यासाठी असतात ते. केशरी, लाल, हिरव्या रंगाना साद घालत वसंतातच कोकीळ बोलू लागतो. त्याचे पडसाद आपल्या मनात उमटतात.

साद-पडसाद ही परस्परपूरक प्रक्रिया आहे. वर्षभर विवेकाने, शारीरतपाने केलेल्या अभ्यासाला परीक्षेत बोलते (लिहिते) करण्याचाही हाच 'चैत्री' मुहूर्त असतो. परीक्षांचा मोसम जसा या वर्षारंभी सुरू होतो, तसे आणखी आणखी 'मुहूर्त' साधत, शोधत सनई-चौघडे वाजू लागतात. विवाह साजरे होऊ लागतात. 'अंगावरच्या शेलारीला बांधीन त्याचा शेला' म्हणत फुलणारी मने प्रेमाचे पूल बांधू लागतात. नववर्षात नवीन जीवनाचीच सुरुवात होते.

'कप तुला, बशी मला
अर्धी लवंग ठसक्याला बरी'

असे 'अर्धम्' मग सुरू होते. या 'अर्धम्'लाही बळ असते आपल्या सर्वांच्या मन:पूर्वक शुभेच्छांचेच.

म्हणूनच मित्रहो, पाडव्याचा शुभमुहूर्त साधून तुम्हा सर्वांना नववर्षाच्या 'अर्धम्' नव्हे; 'सर्वम्' शुभेच्छा.

सर्वे सुखिन: सन्तु।।

*

(पान१ कॉलम ४ वरून)

घरात, छपरामध्ये जरा कुठे जागा मिळाली की चिऊताऊ तिथे आपले घरटे करी. चिमणीने घरात घरटे करणे म्हणजे त्याकाळी समृद्धी, संपत्तीचे लक्षण मानत.

आता काळ बदलला. मोकळ्या खिडक्या गेल्या, छपरं गेली, काँक्रिटच्या जंगलाकरिता झाडे कापली गेली, अंगणे नामशेष झाली. पेस्ट कंट्रोलच्या जमान्यात किड्या-मुंग्यांना जागा उरली नाही. इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणात चिऊताईची `Sparrow' झाली. खिडक्यांना जाळ्या आल्या. बंद खिडक्यामुळे चिमण्या घरात शिरण्याचा प्रश्नच नाही. A.C.च्या जमान्यात पंख्यांमध्ये घरटं करण्याला वावच नाही. विज्ञान-तंत्रज्ञानात माणसाने आभाळापली-कडे झेप घेतली. उंच-उंच मोबाईल-टॉवर्स बांधले. पण हे करताना आपले रोजच्या जीवनातले सखे-सोबती कुठेतरी पारखे होत गेले. आपली बालपणापासूनची मैत्रीण चिऊताई कुठेतरी हरवत गेली. आताच्या पिढीला तिची ओळख आधी तिचं लांबलचक स्पेलिंग पाठ करून करवून घ्यावी लागते. नॅशनल पार्कमधल्या 'बर्ड-वॉच'च्या कार्यक्रमात मग चिमणी दिसली की लहानग्यांना ती खास दाखवावी लागते, 'ती बघ! तिला चिमणी म्हणतात - Sparrow!' सकाळी उठल्याबरोबर ऐकू येणारा चिवचिवाट आता फक्त मोबाईलच्या रिंगटोनवरच ऐकू येतो. पूर्वी लहानग्यांच्या बऱ्याच गोष्टी चिमणीच्या परिमाणात मोजत. जसे 'चिमणे बोल', 'चिमणीच्या दातांनी'. जिथे ही लहानपणापासूनची मैत्रीणच हरवू लागली तिथे या परिमाणांची काय कथा? अशा या आपल्या बालमैत्रिणीच्या संवर्धनाकरता गेल्या दोन वर्षांपासून २० मार्च हा 'जागतिक चिमणी दिन' म्हणून साजरा केला जात आहे. आपल्या घरात येवून तिला घरटे करण्यास वाव नाही. पण खास तिच्यासाठी कृत्रिम घरटी बनवली जात आहेत. 'ग्रीन कव्हर' वाढवण्याकरता सोसायट्यांमध्ये, व्यावसायिक इमारतींभोवती झाडे लावण्याची सक्ती केली जात आहे. चिमण्यांची संख्या वाढण्याकरता जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांना साद म्हणून चिमण्यांचा चिवचिवाट परत ऐकू येईल अशी आशा करायला हरकत नाही. नाही का?

गुढीपाडव्याच्या शुभदिनी

नारळ वाढवला मुहुर्ताचा !!!

..... लवकरच रंगभूमीवर

आणताहेत आपलीच मुलं .....

तिसरी घंटा प्रस्तुत,

दोन अंकी नाटक ......

contact - 98202 31742

for further details please stay tune with our FB account " tisreeghanta "

## पाठारे प्रभु सोशल समाज

गुढीपाडव्यादिवशी (२३-०२-१२) ज्ञातीच्या सोसायटी सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ५ वाजता सोशल समाजाचा १२४ वा वर्धापन दिन थाटात साजरा झाला. अध्यक्षस्थानी विराजमान होते श्री. सुधीर रामचंद्र राव (श.ण्दस., श.ॅ., ण्ॅ.छ्ँ.). समा-रंभाच्या सुरुवातीला पुनम प्रसाद पंडित यांनी सरस्वतीवंदना सादर केली. श्री. आवटी यांची तबल्याची साथ, संगीत संयोजन खुद्द सौ. पुनम यांचे आणि स्वत:च संवादिनीवर त्यांनी सुरेल सादर केलेली सारीच गीते छान होती. स्वागत गीत, अध्यक्षाभिनंदन, विद्यार्थी गौरवगीत आणि समाजगीत त्यांच्या आवाजात ऐकतांना समाजाचा वाढदिवस मनात भरला. अर्थातच गीतांचे शब्द शब्दप्रभु असलेल्या नलिनी तळपदे यांचे होते. हो! श्री. रामराव बाळकृष्ण कीर्तिकर (रामकवी) यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू श्री. सुरेंद्र इंद्रसेन कीर्तिकर यांनी दिलेली चार फुटी गुढी यावर्षी खास शोभत होती. विश्वस्त श्री. अजित तळपदे यांचे मनोगत, अध्यक्ष सौ. प्रमिला तळपदे यांचे मनोगत, स्वाती राणे यांनी पाहुण्यांचा करून दिलेला परिचय, सौ. नीता सेंजित यांचे निवेदन असलेल्या या सोहळ्यात विविध पुरस्कारांचे वितरण झाले. कु. सिमरन बॉबी विजयकर यांना कै. बी. के. धुरंधर स्मरणार्थ बी.ए. प्रथम वर्गाबद्दल सुवर्णपदक प्राप्त झाले. श्री. मनोज माधव नायक यांना कै. आर. जी. विजयकर स्मरणार्थ ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील समाजसेवेबद्दल सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. कै. सच्चिदानंद मोरेश्वर नवलकर स्मरणार्थ उत्कृष्ट दीर्घकालीन ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील समाजसेवेकरिता महिलांसाठी असलेल्या कै. प्रमिला मोतीराम जयकर स्मरणार्थ सुवर्णपदक सौ. अनारकली संदीप वेलकर यांना जाहीर झाले. मात्र त्यांच्या आईचे नुकतेच निधन झाल्याने त्या उपस्थित राहू शकल्या नाहीत. श्री. सतिश कुंजविहारी धैर्यवान यांना धार्मिक सेवेसाठी कै. श्री. वामनराव गोरक्षकर स्मरणार्थ सुवर्णपदक लाभले. कै. श्री. प्रमोद सच्चिदानंद नवलकर स्मरणार्थ साहित्यसेवा सुवर्णपदकाच्या मानकरी होत्या प्रा. सुहासिनी कीर्तिकर; तर सौ. मीना अजबसेन नवलकर यांना कै. श्री. नारायण मानकर आणि कै. शरदकुमार व कै. सनदकुमार वामनराव कोठारे स्मरणार्थ अभिनयासाठी पुरस्कार देण्यात आला. श्री. शीतल नागेंद्र तळपदे यांनी गेल्या काही वर्षांपासून पुरस्कृत केलेल्या कै. नागेंद्र यशवंतराव तळपदे स्मरणार्थ 'हटके' पुरस्काराचे मानकरी होते श्री. ज्योतींद्र दत्ताराम अजिंक्य. सर्व पुरस्कार विजेत्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विजेत्यांचा परिचय सौ. स्वाती जयकर आणि श्री. जयंत कीर्तिकर यांनी करून दिला.

समारंभाचे अध्यक्ष असलेल्या श्री. राव यांनी आपल्या अनुभवावर आधारित आजच्या समाजकारणावर, अर्थकारणावर मोलाचे विचार मांडले. विद्यार्थी म्हणून आपल्या तरुणांनी काय करायला हवे; त्याचे योग्य मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांच्या पत्नीच्या सौ. आशा यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा उचित गौरव केला गेला. त्यांनी समाजाला दहा हजारांची देणगी दिली.

आभारप्रदर्शन स्वाती राणे यांनी केले.

राष्ट्रगीतानंतर हा रंगलेला सोहळा संपला. सांगता अर्थातच कुल्फीने सर्वांचे तोंड गोड करून झाली. पाठारे प्रभु सोशल समाजाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.

*

लेखांक-४

# कालची मुंबई-आजची मुंबई

— विश्वास नारायण अजिंक्य

'ज्या देशात जाल त्या देशाची भाषा आधी शिका' या इंग्रजांच्या धोरणामुळे संस्कृत, मराठी, गुजराती, उर्दू, तमिळ, फारसी अशा भाषा शिकलेले इंग्रज मुंबईत व सर्व भारतभर पसरलेले होते. सनदी कामगारास मराठी, उर्दू, गुजराती, कानडी किंवा कोणतीही मुलखी भाषा शिकल्याशिवाय कलेक्टर किंवा मोठ्या हुद्याचे काम मिळत नसे. ज्या लोकांवर सत्ता गाजवायची असेल त्यांची भाषा आलीच पाहिजे असा दंडकच होता..जनरल व्हॅन्स केनडी नावाच्या इंग्रजाला तर ५-६ स्थानिक भाषा येत होत्या. तो संस्कृतमध्ये निपुण होता. त्याने १८२४ मध्ये मराठी ते इंग्रजी व इंग्रजी ते मराठी अशी डिक्शनरी तयार करून छापून घेतली होती. तर मुंबईचा पोलीस कमिशनर चार्ल्स फोर्जेट हा हिंदुस्तानात जन्माला आलेला व मुंबईतील सर्व भाषांत प्रवीण असा अधिकारी होता. वेषांतरात कुशल अशा या धाडसी गुणांच्या पोलीस अंमलदारामुळे पोलीस खात्याची व्यवस्था सुधारली. त्याच्या भीतीने गुन्हेगारीला पुष्कळ आळा बसला. त्यानेच १८५७च्या लष्करी उठावात मुंबईतील शिपायांनी केलेला कट उघडकीस आणला व दोघा शिपायांना आझाद मैदानावर हजारो लोकांदेखत तोफेच्या तोंडी दिले गेले होते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची सनद दर २० वर्षांनी बदलत असे. कंपनीने आपल्या प्रजेला शिक्षण दिले पाहिजे या अर्थाचे कलम १८१३च्या सनदेत घातले गेले होते.

त्याकाळी मुंबईस रोग्यांना औषधोपचार मिळण्याची व्यवस्था नव्हती. इंग्रजी डॉक्टर अतिशय महाग; तर देशी वैद्य अडाणी म्हणून रोग्यांनी नशीब असेल तर जगावे. नाहीतर मरावे अशी स्थिती होती. म्हणूनच वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी १८४५ साली ग्रँट मेडिकल कॉलेज स्थापन केले गेले. ज्यांच्या नावाने हे महाविद्यालय निघाले ते ग्रँटसाहेब मुंबईचे गव्हर्नर होते. शरीरशास्त्र शिकताना प्रेताची चिरफाड करावी लागेल. त्यामुळे ब्राह्मणादी वरच्या वर्गातील मुले या महाविद्यालयात जाणार नाहीत अशी भाकीते लोक वर्तवीत होते. पण चिरफाडीने अपवित्र होण्याची भीती कॉलेजात स्नानगृहाची व्यवस्था केल्यावर गेली. नव्या हिंदी डॉक्टरांचा व्यवसाय न चालल्यास त्यांना निर्वाहाची चिंता राहू नये म्हणून त्यांना नोकऱ्या देण्याची सोय सरकारने केली होती.

१८५१ मध्ये लंडन शहरात जागतिक कला-कौशल्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्या प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या हिंदी कला-कौशल्याने साऱ्या युरोपातील कलापटूंना आश्चर्यचकीत करून सोडले होते. कला-कौशल्याला उत्तेजन देऊन चित्रकला शिकविण्यासाठी, कलेचे शिक्षण देणाऱ्या संस्थेसाठी मुंबईतील दानशूर जमशेदजी जीजीभाई यांनी १८५३ साली एक रकमी एक लाख रुपयांची देणगी दिली. त्या रकमेतून 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' ही संस्था १८५७ मध्ये चालू झाली.

मुंबईच्या किल्ल्याची तटबंदी १८६० नंतर सर हेन्री बार्टल फ्रीअर या गव्हर्नरने पाडली आणि तिच्या बाहेरचा खंदक बुजवून टाकला. ही तटबंदी फार रुंद होती. पुष्कळदा हवेशीर जागा म्हणून या तटबंदीवर मंडप उभारून व ते रंगीत दिवाबत्तीने सजवून श्रीमंत लोकांच्या घरची लग्नकार्ये होत असत. तटबंदी पाडल्यावर किल्ल्यालगतची भिंतीना लागून असलेली जागा व मूळ किल्ल्याच्या भिंती पाडून तयार केलेली जागा साफसूफ करून मोठे सपाट मैदान तयार केले गेले. हे मैदान खूपच अवाढव्य होते. तिला एस्प्लनेड (मोठी मोकळी जागा) म्हणत. एकेकाळी सलग असलेल्या या मैदानाची विभागणी चार मैदानात करण्यात आली. आर्थर क्रॉफर्ड १८६५ मध्ये म्युनिसिपल कमिशनर झाले तेव्हा मुंबईत रोगराई, रस्त्याची कमतरता इत्यादी गोष्टींनी राज्यकर्ते तसेच मुंबईचे रहिवासी त्रस्त झालेले होते. मैदानात पाणी साचत असे व त्यामुळे रोगराई वाढत असे. एस्प्लनेडचा उत्तरेकडील भाग क्रॉस व आझाद मैदान आणि दक्षिणेकडील भाग कूपरेज मैदान व मूळ मध्यवर्ती मैदानाचा उरलेला भाग ओव्हल मैदान म्हणून ओळखला जाऊ लागला. मैदानाच्या काही भागांवर इमारती बांधण्यात आल्या व रस्तेही काढण्यात आले. ही मैदाने सध्याच्या काळात लोकवस्तीपासून दूर असल्याने त्यांचा मैदाने म्हणून फार कमी उपयोग होतो. प्रदर्शनासाठी, सभा घेण्यासाठी, धरणे धरण्यासाठी वा मोर्चा अडविण्यासाठी त्यांचा जास्त उपयोग होतो.आज ज्या जागेवर स. का. पाटील उद्यान उभे आहे ती पूर्वी ख्रिश्चनांची दफनभूमी होती. १७६३ व १८६३ या कालावधीत तेथे १९३३३ शवपेट्या पुरल्या गेल्या होत्या. जागा भरल्याने जुनी थडगी उकरून नवीन प्रेते पुरण्याची वेळ येऊ लागली. तेथील स्मशानाची व्यवस्था कॅथेड्रल चर्चच्या विश्वस्तांकडे होती. दफनभूमीसाठी मिळणारे अनुदान कमी कमी होत १९४८ साली पूर्णपणे बंद झाले. त्याबरोबर त्या स्मशानभूमीचा वापरही बंद झाला. स. का. पाटील यांनी लंडनला जाऊन त्या जागेवर उद्यान बांधण्याची परवानगी मिळवली. जमीन न उकरता त्यावर मातीचा भराव घालून त्यावर उद्यान उभारण्याचा करार झाला. उद्यानाच्या उभारणीसाठी जपानी तज्ञांचे मार्गदर्शन घेतले गेले. म्हणून ही बाग जपानी बाग म्हणूनही ओळखली जाते. आज पोलीस मुख्यालय असलेल्या जागी पूर्वी मुंबई सरकारचे विधान सभागृह होते. त्याहीपूर्वी सेलर्स होम होते. मुळात त्या जागेवर इंग्रजांची स्मशानभूमी होती.

१८६२ मध्ये भायखळ्यात राणीची बाग (व्हिक्टोरिया गार्डन्स) उभारण्यास सुरुवात झाली. ॲग्री-हॉर्टीकल्चर सोसायटीने हे काम हाती घेतले. दहा वर्षे या संस्थेने या बागेची देखभाल केली. ही बाग व तिची रचना पूर्ण होऊन लोकांना पाहण्यासाठी १८७२ मध्ये खुली झाली व १८७३ मध्ये ती बाग मुंबई नगरपालिकेच्या हवाली केली गेली. या बागेतच भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालय (पूर्वीचा प्रिंस अल्बर्ट अँड व्हिक्टोरिया म्यझियम) आहे. या बागेचे क्षेत्रफळ ४८ एकरांचे आहे.

हिंदूंमधील जातीभेदाचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने समानशील तरुणांनी १८५०च्या सुमारास 'परमहंस सभा' ही संघटना स्थापन केली होती. तिचे आद्यप्रवर्तक राम बाळकृष्ण जयकर हे पाठारे प्रभु गृहस्थ होते. तर प्रार्थना समाजाची स्थापना १८६७ मध्ये झाली. ज्यांना दिवसा शाळेत जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही त्यांच्यासाठी शहराच्या निरनिराळ्या भागात प्रार्थना समाजाने 'रात्रशाळा' काढल्या. मुंबईत राममोहन इंग्लीश स्कूल व चंदावरकर प्राथमिक शाला, याचबरोबर पंढरपुरात बालहत्या प्रतिबंधकगृह व अनाथ बालकाश्रम काढले गेले. भाऊच्या धक्क्याचे शिल्पकार असलेल्या लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांचे चिरंजीव रामचंद्र लक्ष्मणजी हे प्रार्थना समाजाच्या संस्थापकांपैकी एक होते. आर्य समाजाची स्थापना १८७५ मध्ये झाली होती. जातीभेद नष्ट व्हावा याविषयी प्रार्थना समाज व आर्य समाजाचे मतैक्य होते. एक राजकारण सोडल्यास सामान्य जनहिताची अनेकविध उपयुक्त कामे प्रार्थना समाजाने केली आहेत.

मुंबईत इंग्रजी राज्याच्या प्रारंभापासून सुमारे दोनशे वर्षे सारे सरकारी लेखन प्राधान्याने पाठारे प्रभूंच्या हस्ते घडत असे. या लेखकांचे हस्ताक्षर सुवाच्च व सुंदर असल्याची स्तुती अनेक वरिष्ठ इंग्रज अंमलदारांनी मुक्त कंठाने केल्याचे दाखले जुन्या कागदपत्रातून पाहता येतात.

त्याकाळच्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये 'कारकून पाहिजे'च्या जाहिराती येत. ह्या 'वॉण्टेड अ परभू' अशाच येत. म्हणजे लेखनिकाची व्याख्या 'परभू' अशीच त्या काळात होती असे संशोधक अ. का. प्रियोळकर यांनी म्हटले आहे. हस्ताक्षर सुंदर होते तसे या लेखकांचे इंग्रजीही छान होते.

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

दिनांक ३०-०३-२०१२

माननीय संपादिका,
प्रभुतरुण

मला आपणांस कळविण्यास अतिआनंद होत आहे की, यंदा गुढीपाडव्याच्या मंगलदिनी माहीम आणि दादर परिसरातील पाठारे प्रभु हिंदू नववर्ष स्वागतयात्रेत प्रथमच एकत्र येऊन सामील झाले. या सोहळ्यात सामील होण्याचे मुख्य उद्दिष्ट असे होते की, सध्याच्या विस्तारलेल्या मुंबईत असे फार मोजकेच लोक आहेत ज्यांना पाठारे प्रभु हे या मुंबईचे आद्य रहिवासी आहेत हे माहीत असेल. त्याशिवाय आपल्या ज्ञातीतील भूतकाळातील थोर व्यक्ती ज्यांनी मुंबई आणि महाराष्ट्रात अभूतपूर्व योगदान दिले त्यांची महती इतर स्थानिकांना समजावी.

या हेतूने थोडक्या वेळेत जी माहिती जमा करू शकलो त्याचा चित्ररथ बनवला आणि २०-२५ पाठारे प्रभु आपला पारंपारिक पेहराव परिधान करून ज्ञातीच्या माहीम येथील राधाकृष्ण मंदिरापासून सहभागी झालो. यात्रा माहीम ते बालमोहन विद्यामंदिर शाळेपर्यंत जाऊन इतर यात्रेत विलीन झाली. स्वागत समितीने पाठारे प्रभु पोशाख परिधान केल्याबद्दल एक स्मृतीचिन्ह भेट म्हणून दिले. त्याचा स्वीकार माझ्या हस्ते झाला. हे सर्व शक्य होण्यास श्री. नंदकुमार विजयकर, कु. शिल्पा जयकर आणि राहुल आगासकर यांनी मोलाची साथ दिली. यांच्याव्यतिरिक्त जे ज्ञातीबांधव उत्स्फूर्तपणे सहभागी झाले त्यांचे मन:पूर्वक आभार. पाठारे प्रभुंची माहिती असलेला फलक माहीम येथील पाठारे प्रभु चॅरिटीझच्या राधाकृष्ण मंदिरात नवमीपर्यंत लावण्यास मान्यता दिल्याबद्दल श्री. अजित विजयकर यांचेदेखील आभार.


आपला नम्र,
**चारुदत्त धैर्यवान**



पाठारे प्रभु ज्ञाति बांधवांची
गुढी पाडवा व नवीन वर्षासाठी
स्वागत यात्रा
२३ मार्च, २०१२







# MASALA BOX

**- Shweta Uday Kothare**

## Chicken Tikka Skewers

| Ingredient Name | Quantity |
|---|---|
| Boneless chicken ( medium size ) | 1 kg |
| PrabhuSambar masala | 2 tbsps. |
| Garam masala | 2tbsps |
| Everest tandoori masala (optional) | 2tbsps |
| Ginger garlic paste | 2 tbsps. |
| Salt | As per taste |
| Black Pepper powder | 1 tsp |
| lemon juice | 2 tbsps |
| Onion, ,Tomato ,Bell pepper | 3 big size (each) |
| Curd | 5 tbsps |
| chopped fresh coriander leaves and chat masala To garnish | |
| Red chilli | 3 tsp |
| Turmeric powder | 1 tsp |
| Oil | 3 tbsps |
| Wooden Skewers or Toothpick | |

***Preparation***: Cut the Boneless chicken, Onion,Bell pepper in medium sizes and add PrabhuSambar Powder, Garam masala, Everest tandoori masala (optional)Ginger garlic paste, Black Pepper powder, lemon juice, Red chilli, turmeric powder, Curd, Salt as per taste and Oil 1 tbsps. (Refrigerate the marinatedchicken for 2 hrs.Minimum)

Stir Fry the marinated Onion, Bell pepper for 5 minutes in the pan with few drops of oil then take it off from pan. Add2 tbsps.Oil to the same pan, add the marinated chicken. cover the pan and cook it for 10 to 15 minutes(don't add water)

Arrange it on wooden skewers, garnish it with chopped fresh coriander leaves and chat masala and serve it ….with mint chutney.

Tip- to make it more yummy:heat 1 small piece of coal on gas and keep it in between the pan add some drops of oil on the coal as soon as smoke start coming from the coal cover the pan with the lid and keep it for 2 min, This will give the chicken smoke flavour and taste very yummy!!

***Cooking tip for the month:*** When you cook chicken or meat, you should first cook over high heat to seal juices and then lower the heat and cook till tender.

लेखांक ४

# चिमणीच्या दातांनी दंडफुगडी

-कल्पना सुभाष कोठारे

भर गर्दीत, त्या दोघांची जुंपली होती. त्यांचे सहचर बाजूस उभे राहून फक्त प्रेक्षकगिरी करत होते. कोणीच कसे त्यांना थांबवत नव्हते? दोन मुलींनी एकमेकीचे दंड घट्ट पकडून फुगडी घालावयाची असते. त्या प्रकारास 'दंडफुगडी' म्हणतात. इथे त्या दोघांनी एकमेकाचे दंड घट्ट पकडलेले होते. परंतु त्यांचे चार पाय फुगडी न घालता, चक्क लाथा घालत होते. डाव्या व उजव्या पायांनी एकमेकांना लाथा घालीत असतांना ते दोघे मधे थांबत होते. जणू ते युद्धाचे नियम पाळीत होते. म्हणजे एकाचा पाय दुसऱ्याच्या पोटात बसल्यानंतर दुसरा प्रतिस्पर्धी स्वत:चा पाय उचलीत होता. मग परत पहिला, न वापरलेल्या पायाने वार करी. समोरच्याचा पाय जमिनीवर गेल्यावरच दुसरा, न वापरलेल्या पायाने पोटावर लाथ मारी. हाताचा वापर न करता चाललेल्या या लत्ताप्रहाराच्या अनोख्या दृश्याने, त्यांच्या जातभाई-प्रमाणेच, मलाही खिळून ठेवले होते. दोघांतील एकाला बहुधा मार असह्य झाला असावा कारण त्याने अखेर दंड सोडून तेथून पळ काढला आणि ती झुंज संपली. कोण होते ते दोघे? ते दोन कांगारू होते. ऑस्ट्रेलियाचे कांगारू प्राणी पोटातील पिशवीत बाळे ठेऊन, त्यांचे संरक्षण करीत, मैलोन् मैल पळू शकतात- हे ज्ञान मला प्रथमच टी.व्ही.च्या ॲनिमल प्लॅनेटने दिले होते. त्या टी.व्ही. छायाचित्रकारास मनोमन सलाम ठोकून मी टी.व्ही. बंद केला. विचित्र हवामान, अवघड प्रवास यांना तोंड देत हे छायाचित्रकार आपल्यासाठी किती छान चित्रफिती तयार करत असतात नं? अशावेळी टी.व्ही.चे 'इडियट बॉक्स' हे नाव बदलावेसे वाटते.

मानाचा मुजरा करावा असे इतर अनेक कष्टकरी आपल्याला अनेक गोष्टी देत असतात. त्यांच्याकडून मिळणाऱ्या वस्तू सहजतया स्वीकारून, आपण आत्ममग्न होतो. उदाहरणार्थ, शेतकरी, निसर्ग, देव वगैरे. घाबरू नका! शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपर्यंत मी पोचणार नाहीय. कोणत्याही सामाजिक जाणिवा, उणीवा किंवा राजकीय घडामोडी यावर लिहिण्याइतकी माझी पोच नाहीच. तुम्ही किंवा मी करू शकू अशा साध्या, साध्या गोष्टीबद्दलच मी बोलू शकते. उदाहरणार्थ, काही धर्मात इतरांसाठी देवाजवळ प्रार्थना करण्याची रीत आहे. मला ती फार आवडते. 'छग्गे सुखी ठेव, चांग्गी बुद्धी दे!- असे म्हणणारा छोटासा बोबडकांदा तुम्ही कौतुकाने पाहिला असेलही. परंतु तुम्ही स्वत: 'शेजारणीच्या मुलाला मेडिकलला ॲडमिशन मिळू दे' असे म्हणायला कधी वाकडी वाट करून देवळात गेलात? 'एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवीन', 'सत्यनारायण घालीन' किंवा 'खणानारळाने ओटी भरेन'- अशा प्रकारचे नवस स्वत:च्या इच्छापूर्तीसाठीच आपण करून बसतो व फेडतोही! जणू काही देव म्हणजे कोणी लांचखाऊ अधिकारीच! 'अनाथाश्रमास भेट देईन', 'अंधशाळेत वाचून दाखवायला जाईन' किंवा 'शेजारच्या आजी-आजोबांची कामे करून देईन'- असे नवस बोलण्यास काय हरकत आहे? साधे कुलदैवताचे दर्शन ते काय- तेही मित्रमंडळी जमवून सहलीसारखे पार पाडले जाते. वर्षातून एकदा देवीची ओटी भरून झाली की आपण दैनंदिन कामात व्यस्त होण्यास मोकळे होतो. देवाचे आभार वर्षातून एकदाच? त्याऐवजी दरवर्षी शाळेचा युनिफॉर्म कामवालीच्या मुलीला घेऊन दिला तर?

सर्वच भाविक पूजाअर्चा, जपजाप्य, नामस्मरण, ध्यानधारणा, वेळात वेळ काढून करीत असतात. नाही असे नाही. परंतु भक्तीही कधीकधी प्रीतीसारखी यांत्रिक होऊन बसते. लहानपणी गंमतशीर वाटलेला एक प्रकार, आज मागे वळून आठवतांना मला यांत्रिक प्रीतीचा प्रकार वाटतो. संध्याकाळी खेळायला, फिरायला बाहेर पण्यापूर्वी माझी छोटी मामेभावंडे कपडे घालून, तयार होऊन माझ्या आजीच्या खोलीत येत व एकामागोमाग आपला गाल पुढे करीत. आजी त्यांचा 'किस्' घेऊन निरोप देत. या माझ्या आजी म्हणजे आईच्या आई. मी पाहुणी नातवंड तो रोजचा सोहळा मजेत पाही. 'हेवा' हा प्रकार मनाला शिवतही नसे. असे हे बालवय! पुढे एकदा कॉलेजमध्ये मैत्रिणीला मी म्हणाले, 'आज मी परस्पर आजींकडे श्रीपंत भुवनला जाणार आहे. तुझ्याबरोबर येणार नाही.' 'अय्या! तू आजीकडे, काय म्हणतेस?आम्ही तर आजी, मावशीला 'अगं'; म्हणतो!' मैत्रिणीच्या आश्चर्योद्गाराने मला अंतर्मुख केले. तार हाती पडताच माझ्या काळजीने धावत आलेली माझी आजी, मीच दार उघडायला समोर आलेली पाहून हर्षभरीत झाली होती व तिने मला मिठीतच घेतले होते. ही माझ्या वडिलांची आई मम्मा- तिला मात्र मी 'आगं मम्मा'च म्हणत होते. ही होती सहजप्रीती! माझ्यावर अतोनात प्रेम

(पान ६ कॉलम ३ वर)

# चोरांची दुनिया

–अजित मानकर

स्पेनच्या बार्सोलाना शहरात आम्ही फ्लॅमिंको नृत्याचा कार्यक्रम पहाण्यासाठी प्रमुख रस्त्यावर थिएटर बाहेरील रांगेत एके संध्याकाळी उभयता उभे होतो. तसेच, आमच्या पुढे श्री व सौ. साळगांवकर दांपत्यदेखील उभे होते. रांग थोडीशी पुढे सरकल्यामुळे श्री साळगांवकर दोन पाऊले पुढे जाणार, इतक्यात त्या बेसावध क्षणी दोन उनाड टपोरी पोरे, वय वर्षे अंदाजे १०/१२ एका बाजूने धावत आली. त्यापैकी एकाने श्री. साळगांवकरांच्या पायात पाय अडकवून त्यांना खाली पाडले व दुसऱ्याने तितक्याच चपळाईने त्यांच्या हातातील पैशाची पर्स खेचून काढली. कुणालाही काही कळायच्या आतच त्या मुलांनी ती पर्स समोरच्या फूटपाथवर आधीच उभ्या असलेल्या एका गरोदर वाटणाऱ्या स्त्रीकडे भिरकावली. त्यानंतर ती दोन मुले बिनभोबाट धावत पळून गेली व ती स्त्री राजरोस पाकीट खाकेत ठेवून हसत हसत व आम्हाला खिजवीत गर्दीमध्ये बेमालूम मिसळून क्षणांत अदृश्य झाली. सर्व खेळ केवळ काही सेकंदांतच संपला. आम्ही सर्व मंडळी मात्र घडल्याप्रकाराबद्दल अवाक् बघण्यापलिकडे काहीही करू शकलो नाही.

दोन दिवसानंतर स्पेनच्याच दुसऱ्या माद्रिद शहरातील आमच्या हॉटेल वास्तव्यामध्ये आम्ही दुसरा अनुभव घेतला. आमच्याबरोबर असलेले आमचे सहप्रवासी श्री. व सौ. पाटील हे सकाळी न्याहारीसाठी तळमजल्यावरील रेस्टॉरंटमध्ये आले होते. न्याहारी करून ते आपल्या वरच्या मजल्यावरील खोलीत परतले तेव्हा प्रथेप्रमाणे झाडलोट करून खोली बंद करताना त्यांना एक गरोदर स्त्री कर्मचारी आढळली. खोलीत गेल्यावर त्यांच्या लक्षात आले की पूर्ण १०००/- यूरो असलेली त्यांची पैशाची पर्सच गायब झालेली होती. भारतीय चलनात सुमारे रू. ७०,०००/- चा गंडा त्यांना बसला होता. नशीब इतकेच की पासपोर्ट व क्रेडिट कार्डे त्यांच्या स्वत:बरोबरच असल्याने अधिक नुकसान व मनस्ताप टळला होता. लगेचच पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलीसगाडी हॉटेलवर आलीसुद्धा व श्री. पाटील ह्यांनी इंग्रजीमध्ये आपला संशय त्या गरोदर स्त्रीबद्दल पोलीसांना बोलूनही दाखवला. पोलिस जीप फक्त ५ मिनिटे थांबली व लगेचच निघून गेली. हॉटेल मॅनेजरने नंतर खुलासा केला की स्पेनमध्ये तसेच इटालीमध्ये कायद्याप्रमाणे गरोदर स्त्रीयांना संपूर्ण संरक्षण असल्यामुळे पोलिस अशा स्त्रीयांच्या वाटेलाही जात नाहीत, मग त्यांना अटक करणे दूरच राहिले. तात्पर्य, गरोदरपणाचे नाटक करून स्पेन, इटालीसारख्या देशांत ही असली लूटमार सर्रास चालू आहे व सध्याच्या स्थानिक आर्थिक मंदीमुळे ह्या प्रकारच्या चोऱ्यांना ऊतच आलेला आहे. सबब आपला

(पान ६ कॉलम ४ वर)


**MAHABELESHWAR**

*COME HERE TO EXPIRIENCE TO NATURE AT ITS BEST WITH*
*JASMINE COTTAGE*





**THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS .IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST .**
**ALL THE ROOM HAVE SERENE ENVIORMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUEST CAN SIT AND ENJOY THE PLESANT BEAUTY OF THE NATURE.**

**FACILITIES:**
*Attached bath
*Hot & Cold Running water
*television with satellite Connection
*Car Parking
*Large open area for playing outdoor games

**Location:**
It is located near the market in mahabeleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabeleshwar.

**For Booking Contact:**
**Velkars 9930172689 9220451465**

## प्रभुतरुणास देणगी

❁ कै. मंजुळा नारायण धराधर यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त त्यांचे पणतु श्री. अनिरुद्ध राकेश धैर्यवान यांजकडून रु. ५००/-

❁ श्री.उल्हास वामनराव कोठारे यांजकडून पत्नी सौ. स्निग्धा कोठारे यांच्या साठाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. १६१/-

*

## अभिनंदन

❁ कु. आशिका पुष्पल विजयकर 'अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ'तर्फे कथ्थक परीक्षेत ८२ टक्के गुणांनी विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण झाली.

❁ 'झी' वरील 'होम मिनिस्टर' कार्यक्रमात श्री. स्वप्नील कीर्तिकर आणि त्यांची पत्नी यांचा सहभाग होता.

*

## नूतन हास्याभिनंदन

रामराव आणि शामराव दोघे मित्र होते. एका अपघातात दोघेही मरण पावले. सारखेच जीवन जगणारे, एकदम मेलेले. वर त्यांची एकाच ठिकाणी गाठ पडायला पाहिजे होती. पण नाही. देवाने विचारल्यावर रामरावांनी चक्क स्वर्ग मागितला अन् शामरावाने नरक! शामराव नरकात गेले. तेथे उकळत्या तेलात माणसांना ढकलले जात होते. सालटी निघत होती. किंकाळ्या फुटत होत्या. आता शामरावांची घाबरगुंडी उडाली. ते तिथल्या रक्षकाला म्हणाले, 'अहो! हे काय?' रक्षक म्हणाला, 'म्हणजे? तुम्हीच नरक मागितला ना? हा नरकच आहे.' 'पण...पण...मघाशी देवाकडे नेतांना याच नरकाच्या दारात नाचगाणी चालली होती. सनई वाजत होती. किती छाऽन वाटत होतं! म्हणून मी नरक मागितला.' रक्षकाने शांतपणे म्हटले, 'तो आमचा जाहिरात विभाग होता!'

(पान ५ कॉलम ४ वरून)

पासपोर्ट, क्रेडिट कार्ड व चलन ह्या बाबतीत प्रत्येकाला आपल्या जीवापलिकडे जागृक राहून काळजी घ्यावी लागतेच.

मी ऑकलंड ह्या न्यूझिलडंच्या शहरात १ संपूर्ण महिना माझे मित्र श्री. बॅनर्जी ह्यांचे घरी वास्तव्य केले होते. एकदा एका मोठ्या मॉलमध्ये फिरताना मी आपल्या मुंबईच्या सवयीप्रमाणे खिशातील डॉलरच्या नोटा मोजण्यासाठी बिनधास्त बाहेर काढल्या. ते पहाताच श्री. बॅनर्जीनी माझ्या हातावर तात्काळ झडप घालून माझ्या हातून सर्व नोटा काढून घेतल्या व बळेच स्वत:च्या खिशात कोंबल्या. वर त्यांनी मला ताकिदीच्या भाषेत सुनावले की इथे न्यूझिलंडमध्ये सार्वजनिक ठिकाणी आपल्याजवळची रक्कम कधीही बाहेर काढायची नसते. कारण इथले आदिवासी मावरी लोक दिसताक्षणीच हातातील नोटा खेचतात, प्रसंगी हाणामारीदेखील करून पळून जातात. त्यासाठीच इथे सर्व छोटे मोठे व्यवहार फक्त क्रेडिट कार्डावरच करायचे असतात. त्यांनी मला बजावले की ह्यापुढे चलनी नोटा इथे कधीही खिशातून बाहेर काढू नकोस. मी त्याक्षणी आजुबाजूला पाहिले व माझ्या लक्षात ही गोष्ट आली की मावरी लोकांची टपोरी टोळी माझ्या हातातील नोटावर डल्ला मारण्याच्या तयारीतच अगदी जवळ बाजूलाच पोहोचली होती. फक्त श्री बॅनर्जीच्या प्रसंगावधानाने व हस्तक्षेपामुळे मी त्या प्रसंगातून तरून गेलो होतो.

तात्पर्य, आपण समजतो की आपल्या भारतीय शहरातच चोरांचा सुळसुळाट आहे. पण प्रत्यक्षात माझा अनुभव हे सांगतोय की वर वर्णन केल्याप्रमाणे भुरट्या चोरांच्या बाबतीत जगातील काही प्रगत देश हे आपल्यापेक्षा फार पुढे व अग्रेसर आहेत आणि त्याची मुख्य कारणे म्हणजे तिथले विचित्र कायदेकानू व निष्प्रभ पोलिसी यंत्रणा!

त्यातल्यात्यात अमेरिका हा एक देश मला फार भावला की जिथे सचोटी व प्रामाणिकपणा अजूनही बराचसा तग धरून आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर जेव्हा आपणास मॉलमध्ये वगैरे पैसे परत केले जातात तेव्हा ते नीट मोजून घ्यायची तसदी घ्यावी लागत नाही. जशी सुट्या नाण्यांची चवड आपल्या हातात ठेवतात ती तशीच्या तशी सरळ खिशात टाकायची असते. न टाकता आपण त्याच्या समोर पैसे मोजत बसलो तर तो अपमान समजला जातो व चार शिव्यांची खमंग लाखोली पैसे मोजणाऱ्याला ऐकावी लागण्याची शक्यता असते.अर्थातच हा सर्व माझा स्वत:चा अनुभव आहे. व मी तो सर्वासमोर मांडित आहे. माझे काही चुकले असेल, तर क्षमस्व!

शेवटी संतांनी म्हटलेंच आहे.... ''जया जैसा अनुभव तया तैसाची साक्षात्कार....!''

*

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जोजो रे

१८-०२-१२ सौ. सोनाली आणि श्री. नीलेश चित्रसेन कोठारे कन्या, दादर

### नांदा सौख्यभरे

०२-०३-१२ श्री. योगराज विवेक देसाई, कु. कृपाली शामसुंदर पेडामकर (आंतर्ज्ञातीय)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०२-०२-१२ | श्रीमती वीणा रामराव मानकर | वय ९०, | दादर |
| १६-०३-१२ | श्रीमती कुसुम बाळाजी नायक | वय ९३ | खार |

*चुकीची दुरुस्ती:-* गतांकी महिला समाजाच्या वर्धापन दिनाच्या तपशीलात पुढील मजकूर राहून गेला होता-

श्रीमती नीरजा नागेंद्र तळपदे स्मरणार्थ श्री. शीतल तळपदे पुरस्कृत स्मृतिचिन्ह देऊन स्वाती प्रवीण राणे यांचा सन्मान करण्यात आला.

स्वाती राणे यांचे अभिनंदन.

(पान ५ कॉलम २ वरून)

करणाऱ्या माझ्या मावश्या, मात्र परगावी असल्याने मोठेपणीही 'अहो'च राहिल्या.

बसमधून जातायेता सिद्धी-विनायकाच्या कळसाला हात जोडणारे आपण किंवा ट्रेनमधून दिसणाऱ्या माऊंटमेरीचा टॉवर पाहून छातीवर क्रॉस करणारे आपले बांधव ही मला यांत्रिक भक्तीचीच उदाहरणे वाटतात. याउलट घरच्या सत्यनारायणासमोर साष्टांग नमस्कार घालणारा नातेवाईक खरा भक्त वाटतो. नमस्कार, साष्टांग नमस्कार किंवा साधे शेकहॅंड्स- हे ॲक्युप्रेशरच्या दृष्टिकोनातून प्रकृतीस हितावह ठरतात. अगदी रोजच्या सूर्यनमस्काराइतकेच! शरीर-स्वास्थ्यासाठी गल्लोगल्ली 'जिमस्' उघडलेले दिसतात. परंतु मनस्वास्थ्याचे काय? अलीकडेच पुण्याच्या एस.टी. ड्रायव्हरने बेछूटपणे बस चालवून केलेले अपघात हे त्याच्या मनाच्या पराकोटीच्या अशांततेचे उदाहरण होय. देवघरातील घंटीचा मंजुळनाद, शंखनाद किंवा देवळातील घंटानाद यावर कुरघोडी करणारे असंख्य नकोशा नादांना पचवीत आपण जगत असतो. 'रेनोव्हेशन', 'रीडेव्हलपमेंट'च्या नावाखाली सतत अवतीभवती टक्ठक् चालू असते. संगमरवरी टाईल्स कापतांना येणारा आवाज तर महाभयंकर असतो. लाऊडस्पीकर्स सणासुदीस नादप्रदूषणात भर टाकीत राहतात. परीक्षा, आजारपणे यांची तमा ते बाळगत नाहीत. विमानाचे आवाज तर आम्हा सांताक्रूझवासियांच्या पाचवीलाच पुजलेले असतात. एखादे निसर्गरम्य शांत ठिकाण जवळ केले जाते. थोडे दिवस 'अगं आजीच्या' कुशीत राहून आपण परततो, मन शांत होते. अनेक सत्पुरुष लिखाणातून, प्रवचनातून मन:शांतीसाठी उपाय सुचवितात. योग, रेकी, ब्रह्मविद्या यासारखी वेगवेगळी नावे फेर धरून आपल्याभोवती नाचत असतात. मनातील आवाज आणि बाहेरील आवाज यांची झुंज सतत चालू राहते.

लहानपणी नगरपालिकेच्या मैदानात आम्ही खेळायला जात असू. तेथे त्रिकोणी विटा लावून ज्या पायवाटा केल्या होत्या, त्यावरून रेतीत, अभ्रकाचे तुकडे चमचमत असत. ते चमचमते तुकडे गोळा करून, तळहातावर चुरडून, चमचमती मेंदी रंगविण्यात मजा वाटे. प्रौढपणी अशीच मेंदी जमून यायला हवी. लेखन, वाचन, गायन, वादन, पोहणे, प्रवास यासारखे कितीतरी चमचमते अभ्रककण असतात. त्यातील स्वत:चे अभ्रककण उचलून घेण्यास स्वत:स वेळ द्यायला हवा. साधने वेगवेगळी असली तरी मनाने एकादा दंड घट्ट पकडला की दंडफुगडी जमलीच समजा! हेव्यादाव्यांना , दुष्ट विचारांना, खिन्न आठवणींना लाथा मारून 'कांगारू फाईट' करायला हवी. चला तर मद स्वत:साठी प्रत्येक हसरा क्षण वेचूया!

(फोन: २६१०४५५२)

*

// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //



**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*

*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८